# SPPU AFFILIATED CONCERN LETTER

22/01

Shri.Mulikadevi Mahavidyalaya NIGHOJ 414306 Tal.Parner,Dist.A'Nagar

## Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)

*Telephone Nos.* :
020 – 25691233
25601258
25601259
25601250

ACADEMIC SECTION
Ganeshkhind, Pune – 411007, INDIA
*Telegraph* : 'UNIPUNE'
*Fax* : 020-25691233
*Website* : www.unipune.ac.in
*E-mail* : affiliation@pun.unipune.ac.in

Ref. No. : CA/1357

Date : 20/08/2019.

### TO WHOMSOEVER IT MAY CONCERN

This is to certify that Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's **Shree Mulikadevi College Nighoj, Tal. Parner, Dist. Ahmednagar**, is affiliated to the **Savitribai Phule Pune University**, since 2013 (PU/AN/AS/132/2013) The following courses/ subjects are taught in the said college as per approval.

| Sr. No. | Courses | Duration of the course | Affiliation (Permanent/ Temporary) | Validity period |
|---|---|---|---|---|
| 1. | B.A. (Additional English , English, Marathi, Geography, Economics, History, Hindi & Politics ) | 3 years | Temporary | Up to 2018-19 |
| 2. | B.Sc.( Botany, Chemistry, Physics, , Mathematics, Electronics & Zoology) | 3 years | Temporary | Up to 2018-19 |

**This is to inform that the continuation of the affiliation (Temporary) for the period 2019-20 is under process.**

The said certificate is issued as per the request application received from the Principal of the college Ref. No. 37/2019-20 dated 25/07/2019 so as to submit it to the National Assessment and Accreditation Council (NAAC), Banglore

Dy.Registrar
(Academic Section)

Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasark Samaj's
Shri.Mulikadevi College,Nighoj
Tal. Parner, Dist.Ahmednagar
Inward No 22/01
Date 20/08/2019.

PRINCIPAL
Shri.Mulikadevi Mahavidyalay,Nighoj
Tal.Parner,Dist.Ahmednagar-414306

BCS approval letter by by Savitribai Phule Pune University, Pune.


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule PuneUniversity

(Formerly University of Pune)

Ganeshkhind, Pune - 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/९७

Telephone : 020-25621188/97

ईमेल/ Email : affiliation@pun.unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे - ४११००७

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

Academic Section (Affiliation Cell)

वेबसाइट/ Website: www.unipune.ac


संदर्भ क्र : सीए/१४३१

दिनांक : २६/०८/२०२२

(श्री. मुलिकादेवी महाविद्यालय निघोज 414306 ता. पारनेर, जि. अहमदनगर)

प्रति,

मा. प्राचार्य,
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक
समाज अहमदनगर श्री मुलिकादेवी महाविद्यालय
पत्ता: निघोज ता. पारनेर जि. अहमदनगर पिनकोड-४१४३०६
युनिपुणे. आय. डी. :[CAAA020010]

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ साठी नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय/तुकडी/ विद्याशाखा इत्यादींच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत......

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक : एनजीसी एनजीसी २०२२/(११६/२२)/मशि–४, दिनांक ०८ ऑगस्ट, २०२२.

२) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे – ०१ यांचे पत्र क्र.ससं/उशि/पुवि/पुणे/साफुपुवि/२०२२/२६४९ दिनांक २५/०८/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भिय शासन निर्णयाबाबत/आदेशाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ साठी आपल्या महाविद्यालयास पुढील विवरणात नमूद करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय/तुकडी/विद्याशाखा यास संदर्भिय शासन निर्णयाद्वारे/आदेशाद्वारे .'कायम विना अनुदान तत्वावर' मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ मधील तरतूदी तसेच संदर्भिय शासन निर्णयातील/आदेशातील अटी व शर्तींच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/ प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन तसेच प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेल्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यादींमधील तरतूदींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात येत आहे.

| अ. क्र. | नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय/ तुकडी/ विद्याशाखा इ. चा तपशील | संलग्नीकरणाचा प्रकार | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | विज्ञान व तंत्रज्ञान **-बी.एस्सी कॉमप्यूटर सायन्स** | नवीन अभ्यासक्रम | ८० |

आपणांस पुढे असेही कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीचे तसेच विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/ प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन तसेच प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित

करण्यात आलेल्या व येणाऱ्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यादींचे पालन करणे त्याचप्रमाणे आवश्यक तेवढ्या अर्हताधारक प्राचार्य, संचालक—शारीरिक शिक्षण, ग्रंथपाल, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच आवश्यक ते निधी स्थापित करणे व ठेवणे आपल्या संस्थेवर/महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

उपरोक्त नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय/तुकडी/विद्याशाखा इ. च्या नैसर्गिक वाढ/विस्तारीकरण संदर्भातील प्रस्ताव हे **दिनांक ३० सप्टेंबर, २०२२** पूर्वी विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

26/8/2022

(स.द.डावखर)
उपकुलसचिव,संलग्नता कक्ष

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
२. मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
३. मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२
४. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
५. मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१
६. मा. अध्यक्ष/सचिव, संबंधित संस्था
७. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
९. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०. सहा.कुलसचिव, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
११. उपकुलसचिव, छाननी व तालनीकरण कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१२. उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१३. सहा.कुलसचिव, समन्वय कक्ष परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
१४. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१५. सहा.कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१६. सहा.कुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
१७. कक्षाधिकारी, डाटा प्रोसेसिंग युनिट, प्रस्तुत विद्यापीठ

श्री मुळिकादेवी महाविद्यालय, निघोज 414306 ता. पारनेर, जि. अहमदनगर

प्राचार्य
श्री.मुळिकादेवी महाविद्यालय,निघोज
ता.पारनेर,जि.अहमदनगर-४१४३०६

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
## १७ आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

फोन नं.०२०-२६१२१७८३ Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र.शिससं/उशि/पुवि/पुणे/साफुपुवि/२०२२/ २६८९ दि.२५/०८/२०२२

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नविन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय, अतिरीक्त तुकडी,नवीन विद्याशाखांना मान्यता देणेबाबत..**

संदर्भ :- १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनजीसी २०२२/(११६/२२)/मशि-४, दि. ०८/०८/२०२२
३.प्राचार्य, श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज ता.पारनेर जि.अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. २१/२०२२-२३ दि. १७/०८/२०२२

उपरोक्त विषयाचे संदर्भात सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या नविन महाविद्यालयांना मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे नवीन अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडया सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे :-

| अ.क्र | क्र. | संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नविन अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| ७९ | ७. | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अहमदनगर श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज ता.पारनेर, जि.अहमदनगर | नवीन अभ्यासक्रम/विषय बी.एस्सी- कॉम्प्युटर सायन्स |

उक्त संस्थेने शासन आदेशानुसार रु. १००/- च्या नॉन ज्युडिसिअल स्टॅम्प पेपरवर उक्त नविन महाविद्यालय/अभ्यासक्रम/विषय यास भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये या कार्यालयाकडे सादर केलेले आहे. या हमीपत्राच्या आधारे खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

Shri Mulikadevi Mahavidyalaya, NIGHOJ 414306, Tal.Parner,Dist.A'nagar

महाराष्ट्र विद्यापीट अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार तसेच, अटी व शर्तीनुसार महाविद्यालयाने संबंधित विद्यापीटाने विहीत केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. तसेच, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी सुविधा उपलब्धेतेबाबत तसेच शासन मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे. व्यवस्थापनाच्या उपरोल्लेखीत नवीन महाविद्यालयासाठी/अभ्यासक्रमासाठी/विषयासाठी संलग्नीकरण करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास हे कार्यालय शिफारस करीत आहे.

उक्त प्रमाणे शासनाच्या संदर्भिय निर्णयान्वये कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी शासनास, मा. संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१

प्रत- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. प्राचार्य, श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज ता.पारनेर जि.अहमदनगर.

Shri Mulikadevi Mahavidyalaya NIGHOJ 414306 Tal. Parner Dist. A'nagar

शैक्षणिक वर्ष २०२२-२३:
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांना मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक: एनजीसी २०२२/(११६/२२)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ८ ऑगस्ट, २०२२.

**संदर्भ** : (१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७.
(२) शासन अध्यादेश असाधारण क्रमांक ५९ दिनांक ३ ऑगस्ट, २०२२

**शासन आदेश**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ आणि संदर्भाधीन दि.१३.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) व त्याखालील परंतुकान्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार त्या महाविद्यालयाच्या परिसरातील **उच्च शिक्षणाची मागणी व शैक्षणिक निकड लक्षात घेता** अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात खालील विवरणपत्रात नमूद केल्यानुसार नवीन अभ्यासक्रम/विषय/विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाच्या प्रचलित **कायम विनाअनुदान तत्वाच्या धोरणानुसार** मंजूरी देण्यात येत आहे.

**विवरणपत्र - अ**
**नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय**

| अ.क्र. | क्र. | संस्थेचे/ महाविद्यालयाचे नांव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/विषय |
|---|---|---|---|
| | | **मुंबई विद्यापीठ, मुंबई** | |
| १. | १. | डेक्कन एज्यूकेशन सोसायटीचे किर्ती एम. डुंगरसी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय<br>काशीनाथ धुरू मार्ग, वीर सावरकर मार्ग, आगार बाजार जवळ, दादर (प), मुंबई- ४०० ०२८ | **नवीन अभ्यासक्रम**<br>१) एम. ए. (कम्युनिकेशन ॲन्ड जर्नलिझम) (०-६०) |
| २. | २. | खैरूल इस्लाम हायर एज्यूकेशन सोसायटीचे महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स २४६-ए, जहांगिर बोमन बेहराम रोड, मुंबई- ४०० ००८ | **नवीन अभ्यासक्रम**<br>१) एम. ए. (इंग्लीश) (०-६०)<br>२) एम. ए. (बिझनेस इकॉनॉमिक्स) (०-६०)<br>३) एम. ए. (उर्दू) (०-६०) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महाविद्यालय मु. कुरकुंडी, पो. - घारगांव, ता. - संगमनेर, जि. अहमदनगर | **बी.कॉम - कॉस्ट ॲन्ड वर्क्स अंकाऊटींग**<br>**बी.कॉम- बँकीग ॲन्ड फायनांस** |
| ७६. | ४. | शिर्डी साई रूरल इन्स्टिट्यूट कला विज्ञान व वाणिज्य महाविघालय पत्ता: मु पो- राहाता ता:राहता जि:अहमदनगर पिनकोड-४२३ १०७ | **नवीन अभ्यासक्रम/ विषय -**<br>विज्ञान व तंत्रज्ञान - **एम.एस्सी. अनलिटिकल केमिस्ट्री**<br>वाणिज्य व व्यवस्थापन -<br>**बी.बी.ए. -**<br>**विशेष स्तर** विज्ञान व तंत्रज्ञान -<br>**बी.एस्सी. (बॉटनी, झुलॉजी)** |
| ७७. | ५. | प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था पद्मश्री विखे पाटील आर्ट्स,सायन्स व कॉमर्स महाविद्यालय प्रवरानगर पत्ता: मु. पो. लोणी ता.: राहता जि: अहमदनगर पिनकोड: ४१३७१३ | **नवीन अभ्यासक्रम/ विषय**<br>वाणिज्य व व्यवस्थापन - **बी.बी.ए.** |
| ७८. | ६. | प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था वीमेन कॉलेज ऑफ होम साइन्स एंड बी सी ए पत्ता: लोणी , तालुका - राहता जिल्हा - अहमदनगर ता.: राहता जि: अहमदनगर पिनकोड: ४१३७१३ | **नवीन अभ्यासक्रम/ विषय**<br>विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस्सी<br>**(कॉम्प्युटर ॲप्लिकेशन)** |
| ७९. | ७. | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज अहमदनगर श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर | **नवीन अभ्यासक्रम/ विषय**<br>**बी.एस्सी.** कॉम्प्युटर सायन्स |
| ८०. | ८. | दि फ्रेंड्स ऑफ दि डिप्रेस्ड लिग शेवगाव निर्मलाताई काकडे आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, ता.शेवगाव, जि. अहमदनगर | **नवीन अभ्यासक्रम/ विषय**<br>**बी.एस्सी.** कॉम्प्युटर सायन्स<br>**बी.ए.** - अर्थशास्त्र, इंग्रजी, इतिहास, हिंदी<br>**बी.कॉम** - कॉस्ट ॲन्ड वर्क्स अकांउन्टीग, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन |
| ८१. | ९. | सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पत्ता: ता.: संगमनेर जि: अहमदनगर पिनकोड: ४२२६०५ | **नवीन अभ्यासक्रम/ विषय**<br>विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस्सी.<br>**अनलिटिकल केमिस्ट्री, झुलॉजी**<br>**बी.सी.ए.**<br>विषय -वाणिज्य व व्यवस्थापन -<br>एम.कॉम. (रीसेंट ॲडव्हानसेस इन अकाऊंटिंग टॅक्सेशन अँड ऑडिटिंग, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद** | |
| ४२. | १. | शिवसागर सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय, नांदुरघाट, ता. केज, जि. बीड | **नवीन विद्याशाखा**<br>विज्ञान |
| ४३. | २. | जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड | **नवीन विद्याशाखा**<br>वाणिज्य |
| ४४. | ३. | आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के.टी. पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, उस्मानाबाद | **नवीन विद्याशाखा**<br>बी.सी.ए. |

**२. अटी व शर्ती :**

१. उपरोक्त विवरणपत्रात ज्या अनुदानित महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्या कायम विनाअनुदान तत्वावरील असल्याने सदर मान्यतेच्या अनुषंगाने अशा महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मागणी करता येणार नाही.

२. उपरोक्त प्रमाणे ज्या महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅंप पेपरवर सादर करावे.

३. महाविद्यालयाने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

४. महाविद्यालयांनी, संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

५. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करू नये.

३. विद्यापीठांनी संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी शासन मान्यता आदेशांचे अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

४. मंजूर करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी नियतकालिक आढावा घेऊन सदर नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांची मान्यता रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २४४६/२०१३ व २४४८/२०१३ मध्ये उपस्थित केलेल्या बाबी विचारात घेता या अटी संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ व विभागीय सहसंचालक यांची राहील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०८०८१८२५३०९८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DATTATRAYA RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=44c81ed7c5650383de2d3bd4939feb17be94c77ddf9380bfe3d4af1d10cfd393, serialNumber=6c5292c043ebba90984d77378c6e4fb506d9694e3e8f08dd386c5d3f42e79b10, cn=DATTATRAYA RAMBHAU KAHAR
Date: 2022.08.08 21:30:54 +05'30'

( द. रा. कहार )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
३. प्रधान सचिव (उ. व तं. शि.), मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
७. विशि-३/विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत)
९. निवडनस्ती (मशि-४)

Shri Mulikadevi Mahavidyalaya
NIGHOJ
414306
Tal.Parner,Dist A'nagar

PRINCIPAL
Shri Mulikadevi Mahavidyalaya,Nighoj
Tal.Parner.Dist.Ahmednagar-414306